Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com

वर्ष २ रे | अंक : ६९३. वा | बुधवार | दि. २८ फेब्रुवारी २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये







# जिल्हा सामान्य रुग्णालयाची अवस्था आंधळं दळतं अन् कुत्रं पीठ खातं..

## कुणाचाच कुणाला मेळ नाही अशी स्थिती, अनागोंदीपणाचा कळस...

## अबब बहती गंगा मे इन भ्रष्टचारियोने पुरा क्या पुरा नं.. होकर नहा लिया...

**पोस्टमार्टम ६७**

**जनसंचलन/ बुलढाणा**

येथील जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या गलथान कारभाराने आता अक्षरशः एव्हरेस्टचे टोक गाठले की काय, अशी स्थिती निर्माण झाली आहे. सध्या जिल्हा रुग्णालय प्रशासनाचा कुणाचाच कुणाला मेळ नसल्या कारणाने आंधळं दळतं अन् कुत्रं पीठ खातं अशी स्थिती झाली आहे. कुणीही कुणास जुमानत नाही आणि कुठलाही नियम येथे पाळला जात नाही, हे गेल्या काही महिन्यांमधील कारभारावरून स्पष्ट झालेले आहे. दुसरीकडे जिल्हा सामान्य रुग्णालयात भ्रष्टाचाराने प्रचंड थैमान घातले असून, कोणत्याही प्रक्रियेत निहित नियमांचे पालन केले जात नसल्याचे दिसून येत आहे. जिल्हा रुग्णालयाच्या कॅशबुकात गेल्या काही वर्षांमध्ये प्रचंड प्रमाणात खाडाखोड करून कोट्यवधी रुपयांचा घोटाळा करण्यात आला आहे. या घोटाळ्याचे मुख्य सूत्रधार हे तत्कालीन रोखपाल पी. के. माळी हे होते. माळी यांनी कॅशबुकात खाडाखोड करीत प्रचंड प्रमाणात हेरफेर केला. गेल्या काही वर्षांत जिल्हा रुग्णालयाकडून अव्वाच्या सव्वा वाढीव बिले अदा केली आहेत. ही बिले मंजूर करताना अगदी खालपासून वरपर्यंत सर्वच अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचार केलेला आहे. कद्दू कटेगा तो सबमें बटेगा या उक्तीप्रमाणे भ्रष्टाचारातील हिस्सा हा सर्व अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचता करण्यात आल्याचे जिल्हा रुग्णालयात सर्रासपणे बोलले जात आहे. पी. के. माळी यांची नंतर बदली झाली. म्हणजे माळी हे सौ चूहे खाके बिल्ली यात्रा को चली या उक्तीप्रमाणे येथे प्रचंड भ्रष्टाचाराचा मलिदा लाटून सुमडीत निघून गेले. नंतर त्यांची बदली झाली. पुढे ते सेवानिवृत्त देखील झाले. त्यांनी आपला चार्ज सोडताना संपूर्ण कागदपत्रे विद्यमान रोखपाल श्री संत आर.एस.लाकडे यांच्याकडे सुपूर्दच केली नाहीत. म्हणजे त्यांनी परिपूर्ण चार्ज लाकडे यांच्याकडे दिलाच नाही. लाकडे यांनीही बेशरमपणे खावो खजाओ बत्ती बुजाओ चे ढोंग करून अर्धवट चार्ज आनंदाने स्वीकार केला. खरे तर लाकडे यांच्याकडे आज परिपूर्ण चार्ज नसल्यामुळे त्यांच्याकडे अनेक प्रकारचे अधिकार नाहीत. तरीही लाकडे हे लाखो रुपयांची बिले काढत आहेत. हा सर्व मस्तवालपणा आर.एस.लाकडे कशाच्या भरोश्यावर करीत आहेत, हे रुग्णालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना देखील माहिती नाहीत. जिल्हा रुग्णालयातील बड़े अधिकारी हे आपल्या अधिकारांचा अजिबात वापर करीत नाहीत, तर दुसरीकडे काही अधिकारी आपल्या अधिकारांचा सर्रास दुरुपयोग करीत आहेत. ही लाखो रुपयांची बिले काढण्याचे अधिकार श्री संत आर.एस.लाकडे यांना नसताही ते दिवसाढवळ्या हे प्रकार करीत आहेत. एकीकडे हा सगळा गोंधळ होत असताना जिल्हा रुग्णालयात मोठ्या प्रमाणात ऑन लाईन / ऑफ लाईन नियमबाह्य टेंडरिंग प्रक्रिया पूर्ण होत आहे. टेंडरिंग प्रक्रियेसाठी नियम मोठे कडक असतात. टेंडर घेणाऱ्या व्यक्तीची एक विशिष्ट अशी शैक्षणिक व अनुभवाची पात्रता असावी लागते. मात्र, या ठिकाणी टेंडरिंग काढताना सगळे काही मॅनेज केले जात आहे. लायकी नसलेल्यांना आणि शैक्षणिक पात्रता नसलेल्यांना टेंडर दिले जात आहेत. त्यानंतर या टेंडरची कामे कोणीतरी तिऱ्हाईत व्यक्ती करीत आहेत. हे सर्व प्रकार राजरोसपणे सुरू आहेत. मात्र, याकडे ना जिल्हा शल्यचिकित्सकांचे लक्ष आहे ना आरोग्य उपसंचालक (अकोला) यांचे. सगळीकडे भ्रष्टाचार, नियमभंग आणि कायदे धाब्यावर बसवून कामकाज रेटले जात आहे. काही महिन्यांपूर्वी बुलढाण्याचे आमदार संजुभाऊ गायकवाड यांनी थेट विधानसभेत जिल्हा रुग्णालयात ९९ कोटींचा भ्रष्टाचार झाल्याचे म्हटले होते. त्यानंतर हा आकडे २०० कोटींचा असल्याचेही बोलले जात आहे. या घोटाळ्याच्या चौकशीसाठी चार-चार वेळा चौकशी समिती बुलढाण्यात येऊन गेली. आजवर ना त्या चौकशीचे आपण सर्व भाऊ मिळून खाऊ प्रमाणे अहवाल समोर आले, ना त्याचे ॲक्शन टेकन रिपोर्ट समोर आले, ना कुणावर ठपका ठेवला गेला, ना कुणावर आजवर कारवाई झाली. म्हणजे एकीकडे अनिर्बंध भ्रष्टाचार करायचा, दुसरीकडे तो भ्रष्टाचार दाबण्याचा प्रयत्न करायचा, चौकशांची नाटके करायची आणि त्यानंतर अहवालात सर्व काही दडवून टाकायचे, हा प्रकार सुरू आहे. जिल्हा रुग्णालयात बोकाळलेल्या विविध गैरप्रकार, भ्रष्टाचार यावर एकीकडे काहीही कारवाई होत नाही, किंबहुना भ्रष्टाचाराला खतपाणीच घातले जात आहे. असे असतानाही दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज मात्र सातत्याने या भ्रष्टाचाराविरोधात निकराचा लढा घेऊन आपली सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न करीत आहे व करीतच राहणार. जोपर्यंत भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई केली जात नाही, तोपर्यंत ही मोहीम अशीच आम्ही सुरू ठेवणार आहोत.

**करोडो रुपयांचा भ्रष्टाचार प्रकरणात तत्कालीन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.प्रेमचंद पंडित व डॉ. नितीन तडस यांच्या कार्यकाळात झालेल्या भ्रष्टाचाराच्या विविध तक्रारी व त्यावर चौकशीसाठी आलेले पथक यांनी किती सत्यता मांडली कश्या प्रकारे दिले अहवाल यह अंदर की बात है... करोडो रुपयांचा आलेल्या निधीची फक्त कागदोपत्री कशी लावली वाट याची व त्या अधिकाऱ्याची व कर्मचार्याची नावे व चल / अचल संपत्ती अपसंपदाची संपूर्ण माहिती पुढील प्रत्येक सत्रात**




**जो पर्यंत दोषींनी भ्रष्टाचार करून जमवलेली करोडो रुपयांची संपत्ती / अपसंपदा शासन तिजरीत जमा होत नाही दोषीना गजाआड करत नाही आमचा हा पोस्टमार्टम सत्र असाच सुरू राहणार**

अजून बरेच काही पुढील भागात...

# संग्रामपूर तालुक्यातील ग्राम कोलद येथील माजी सरपंच यांचा खून...

**जनसंचलन/ संग्रामपूर**

संग्रामपूर ग्राम कोलद येथील - माजी सरपंच गजानन मोतीराम देऊळकर वय ५५ यांचा मृतदेह मंगळवारी सकाळी माळेगाव रस्त्यावर दिसून आला. या प्रकरणी मृतकचे मोठे भाऊ प्रल्हाद मोतीराम देऊळकर यांनी तामगाव पोलिसात फिर्याद दिली. यावरून त्याच गावातील नितीन महादेव देशमुख, ज्ञानेश्वर भास्कर काळे, अमोल ब्रह्मदेव मिसाळ या तिघांना ताब्यात घेण्याची कारवाई पोलिसांनी सकाळीच केली. या घटने संदर्भात अधिक हकीकत अशी की, माळेगाव रस्त्यावर माजी सरपंच गजानन मृतक गजानन देऊळकर देऊळकर यांचे प्रेत पडून असल्याची माहिती पोलीस पाटील व सरपंच यांनी सकाळी ९ वाजता पोलीसांना मोबाइलद्वारे दिली. यावरून एपीआय राजेंद्र पवार, पीएसआय दीपक सोळंके, पोलीस हेड कॉन्स्टेबल अशोक वावगे, पोहेकॉ रामकृष्ण माळी यांनी घटनास्थळावर जाऊन पंचनामा केला. यानंतर दुपारी बुलढाणा येथील श्वान पथकाने मार्ग शोधण्याचा प्रयत्न केला. सायंकाळी मृतकचे प्रेताची उत्तरीय तपासणी करून प्रेत नातेवाईकांचे ताब्यात देण्यात आले. रात्री ९ वाजता मृतक माजी सरपंच गजानन देऊळकर यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या घटनेसंदर्भात रात्री उशिरा माहिती घेतली असता असे समजले की, मृतकचा भाऊ यांनी तामगाव पोलिसात दिलेल्या फिर्यादीनुसार वरील ३ आरोपी विरुद्ध अपराध नंबर ५०/२४ कलम ३०२ भादविनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना एकरी ५० हजारांची मदत द्या- संदीप शेळके

## जिल्हाधिऱ्यांमार्फत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे मागणी

**जनसंचलन/ बुलढाणा**

जिल्ह्यात २६ फेब्रुवारी रोजी झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतीपिकांचे अतोनात नुकसान झाले. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना एकरी ५० हजारांची मदत द्या, अशी मागणी वन बुलढाणा मिशनचे संकल्पक संदीप शेळके यांनी जिल्हाधिऱ्यांमार्फत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे. जिल्ह्यात यापूर्वीच अवकाळी पावसाने झालेल्या नुकसानातून शेतकरी अजून सावरलेला नाही. तोच पुन्हा २६ फेब्रुवारी रोजी रात्री अवकाळी पाऊस, गारपीट, वादळी वाऱ्याने जिल्ह्यात थैमान घातले. यामध्ये शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. मलकापूर, लोणार, संग्रामपूर, शेगाव या तालुक्यात मोठ्या प्रमाणात गारपीट झाल्याने शेतीपिकांना मोठा फटका बसला. गहू, हरभरा, मका, ज्वारी, संत्रा, भाजीपाला पिकांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले आहे. लोणार तालुक्यातील किनगाव जट्टू, बीबी,देवानगर, गोवर्धन नगर या भागात जोरदार पावसासह गारपीट झाली. किनगाव राजा परिसरातही शेतीचे अतोनात नुकसान झाले आहे. सिंदखेडराजा तालुक्यातील मलकापूर पांग्रा, दुसरबिड भागातही गारपीट झाली. शेगाव तालुक्यातील भोनगावात जवळपास एका तासापेक्षा अधिक वेळेत गारपीट झाल्याने शेतमालाचे प्रचंड नुकसान झाले आहे. आधीच अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांसमोर अवकाळीमुळे संकटांचा डोंगर उभा ठाकला आहे. शेतकरी यामधून सावरला पाहिजे यासाठी शासनाने नुकसानीचे तत्काळ पंचनामे करुन मदत जाहिर करावी, अशी मागणी संदीप शेळके यांनी केली आहे. जिल्ह्यातील शेतकरी आधीच मेटाकुटीस आलेला आहे. उत्पादनास भाव नसल्याने शेतकरी डबघाईस आलेला आहे. कोरोना काळापासून संकटात अडकलेला शेतकरी आता



कुठे मोकळा श्वास घेऊ पाहत होता. मात्र पर्यावरणाने त्याच्या तोंडी आलेला हा घास सोमवारी रात्री हिरावून घेतला. सोमवारी सायंकाळपासूनच आकाशात ढग दाटून आले होते. सायंकाळी सात वाजेपासून अवकाळी पावसास सुरुवात झाली. जिल्ह्याभरात अनेक ठिकाणी गारपीट झाली. अवकाळी पाऊस रात्री उशिरापर्यंत सुरूच होता. या अवकाळी पावसामुळे जिल्ह्याभरातील गहू, हरभरा, मका, ज्वारी, भाजीपाला, फळपिकांची प्रचंड हानी झालेली आहे. शासनाने शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी संदीप शेळके यांनी केली.

# श्री शिंदे गुरुजी कन्या विद्यालय बुलढाणा येथे मराठी भाषा गौरव दिन साजरा

**जनसंचलन/जुलढाणा**



मराठी भाषेचा गौरव दिन बुलढाणा येथील श्री शिंदे गुरुजी कन्या विद्यालय येथे साजरा करण्यात आला .बहू भाषिक अभ्यासक व कवी मांगीलाल राठोड प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. मराठी भाषेचा इतिहास खूप मोठा आहे.गौरवशाली आहे. विद्यार्थ्यांनी बोली भाषेचा देखील चौकसपणे अभ्यास करावा. नवीन शब्दांच्या नोंदी करून अर्थ शोधावे व संग्रह करावा. अशा प्रकारे मार्गदर्शन राठोड यांनी केले. मुख्याध्यापिका डॉ संजीवनी शेळके कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या.मराठी विभाग प्रमुख सुलभा पंडित - सोनुने यांनी प्रास्ताविकातून वि.वा.शिरवाडकर यांच्या साहित्यिक योगदानाबद्दल माहिती दिली. विद्यार्थ्यांनी निरनिराळ्या साहित्यिकांनी बद्दल माहिती देऊन त्यांचे मराठी भाषेतील योगदान विशद केले. वडर गोरमाटी इत्यादी वेगवेगळ्या भाषांमधून विद्यार्थ्यांनी मराठीविषयी गौरव पर विचार व्यक्त केले .

# तळणी येथे गजानन महाराजांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा सोहळा संपन्न!

**जनसंचलन/मोताळा**

तालुक्यातील तळणी येथे श्री.संत गजानन महाराजांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा सोहळा दि.२६ फेब्रुवारी रोजी संपन्न झाला. शेगाव येथून गजानन महाराज, गणपती बाप्पा, महादेवाची पिंड आणून गावात महिलांनी सडा साळवण करुन रांगोळ्या काढून ठिकठिकाणी भव्य दिव्य दिंडीचे स्वागत करण्यात आले. दुसऱ्या दिवशी पाच जोडप्यांच्या हस्ते विधिवत पुजा करून प्राणप्रतिष्ठा सोहळा संपन्न झाला. सर्व गावकऱ्यांच्या सहकार्याने मंदीराचे काम यंदा संपन्न झाले. श्रीं चे मंदिर लाईटींग ने सजवण्यात आले आहे. ३ मार्च रोजी श्रींचा प्रगटदिन असल्यामुळे मंदिरावर प्राणप्रतिष्ठा निमित्त विविध कार्यक्रमांची रेलचेल सुरु आहे. श्रीं चे भक्तगण मोठ्या प्रमाणात गावात असून कार्यक्रमाची शोभा वाढली आहे. प्रगटदिनानिमित्त सामुदायिक



गजानन महाराज विजय ग्रंथाचे पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच महाराष्ट्रातील नामवंत किर्तनकार हभप कांचनताई शेळके यांच्या किर्तनाचा कार्यक्रम गावकऱ्यांच्या वतीने आयोजित करण्यात आला आहे. तरी सर्व कार्यक्रमाचा परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन, गजानन महाराज मित्र मंडळाळाचे वतीने करण्यात आले आहे. श्रींच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा होम-हवन, गण गण गणांत बोते चा मंत्रजप, महाआरती शेवटी प्रसादाचे वाटप करण्यात आले. प्रगटदिनाच्या अनुषंगाने गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# सचिन खंडारे यांना उत्कृष्ट पत्रकारितेचा पुरस्कार प्रदान !

**जनसंचलन/बुलढाणा**

माणुसकी सोशल फाउंडेशन व ग्राहक उपभोक्ता संरक्षण समितीच्या तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्त नाशिक येथील शेवंता लॉन्स येथे झालेल्या वर्धापन दिन कार्यक्रमांमध्ये बुलढाणा जिल्ह्यातील पत्रकार सचिन खंडारे यांना उत्कृष्ट पत्रकारितेचा पुरस्कार देऊन दि . २६ फेब्रुवारी रोजी गौरवण्यात आले . यावेळी नाशिक येथे पार पडलेल्या शानदार कार्यक्रमांमध्ये झालेल्या कार्यक्रमांमध्ये कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ग्राहक उपभोक्ता संरक्षण समितीचे संस्थापक अध्यक्ष दादासाहेब केदारे होते तर प्रमुख उपस्थिती म्हणून सकाळचे माजी संपादक जेष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे .प्रकाश लोंढे नगरसेवक अशोक आव्हाड माजी न्यायाधीश , मोहन अडागळे समाजसेवक , प्रशांत दिवे नगरसेवक . नंदकिशोर साळवे साहित्यीक , संजय काळे,डॉक्टर अविनाश झोटिंग राष्ट्रीय सचिव, डॉ . प्रविणकुमार चव्हाण राष्ट्रीय कार्याध्यक्ष,मन्सूर भाई मुल्लानी राष्ट्रीय मुख्य संघटक कैलास अहिरे राष्ट्रीय संपर्कप्रमुख,रवींद्र उगले राष्ट्रीय संघटक,संदीप रोकडे, राष्ट्रीय सदस्य,मंगेश मोहिते महाराष्ट्र राज्य अध्यक्ष आदिती गायकवाड महाराष्ट्र राज्य अध्यक्षा,रोहिणी ताई जाधव राज्य उपाध्यक्ष सचिन पवार राज्य संपर्कप्रमुख,यांच्यासह आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते, यावेळी बुलढाणा जिल्ह्यातील पत्रकार सचिन खंडारे यांना माणुसकी सोशल फाउंडेशन व ग्राहक उपभोक्ता संरक्षण समिती नाशिक तर्फे उत्कृष्ट पत्रकारितेचा पुरस्कार देऊन गौरवण्यात आले . शाल ,पुष्पगुच्छ,मेडल,ट्रॉफी,सन्मानपत्र,असे पुरस्काराचे स्वरूप असून बुलढाणा जिल्ह्यामधून,ग्राहक उपभोक्ता संरक्षण समितीचे विदर्भ मुख्य संघटक सुनील अंभोरे,बुलढाणा जिल्हा सचिव



राजेंद्र मोरे,जिल्हा उपाध्यक्ष रावसाहेब वायाळ बबन सरकटे, देऊळगाव राजा तालुका अध्यक्ष मा . प्राचार्य अशोक खरात,शेगाव तालुका अध्यक्ष सागर शिरसाठ खामगाव तालुका अध्यक्ष प्रशांत तायडे,मेहकर तालुका अध्यक्ष गणेश चव्हाण , सिंदखेडराजा तालुका उपाध्यक्ष विठ्ठल राठोड,चिखली संघटक वाकोडे, सिंदखेडराजा मुख्य संघटक अरुण तौर, तिच्यासह बुलढाणा जिल्ह्यातील अनेक पदाधिकारी यावेळी कार्यक्रमाला उपस्थित होते .

# दर्शनासाठी आलेल्या भाविकाची मोटारसायकल लंपास

**जनसंचलन/ शेगाव**

शेगाव श्रींचे दर्शनासाठी आलेल्या नांदुरा येथील एका भाविकाने जुन्या पोलीस चौकी जवळ उभी केलेली मोटरसायकल अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना २५ फेब्रुवारी रोजी रात्री घडली. याबाबत गोकुळ नगर नांदुरा येथील महेश गणेशराव वाघमारे वय २७ वर्ष यानी शेगाव शहर पोलीस स्टेशनला फिर्याद दिली की शेगाव येथील गजानन महाराजांचे दर्शनासाठी २५ फेब्रुवारी रोजी रात्री साडेनऊ ते दहा वाजे दरम्यान आलो असता जुनी मंदिर पोलीस चौकीजवळ मी माझी मोटरसायकल हँडल लॉक करून उभी करून ठेवली होती. मात्र दर्शनानंतर आल्यावर उभी करून ठेवलेल्या ठिकाणी माझी मोटरसायकल क्रमांक २८-८२२१ किंमत २० हजार ही दिसली नाही. सर्वत्र शोध घेतला असता मिळून न आल्याने सदर मोटरसायकल अज्ञात चोराने लंपास केली असेल असे समजले. अज्ञात आरोपीविरुद्ध कलम ३७९ भादंविनुसार गुन्हा दाखल केला आहे.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code- MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# अनुकूल परिस्थितीतील एकूण पाच जणांची अभियोग्यता चाचणीतून शिक्षक पदी नियुक्ती

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

मलकापूर पांगरा येथील एकूण पाच जणांची अभियोग्यता चाचणीतून शिक्षक पदी नियुक्ती झाली आहे येथील गरिब अनुकूल परिस्थितीतील व्यक्तींची निवड झाली आहे यात शेख तोफिक शेख हबीब नवी मुंबई महानगरपालिका येथे तर शेख राजीक शेख हमजा यांची कोल्हापूर नगरपरिषद शेख अलीम शेख अब्रार सांगली जिल्हा परिषद तर शेख मोहसीन शेख मुसा जिल्हा परिषद पुणे व शेख याईया शेख मुसा जिल्हा परिषद नागपूर येथे नियुक्ती झाली आहे एकाच कुटुंबातील चार व एका घरातील दोन्ही भावंडांची नियुक्ती झाल्याने गावभर आनंद व्यक्त केल्या जात होता विशेष म्हणजे शेख मुसा शेख शौकत यांचे मागील वर्षी हरदेविकाऱ्याच्या झटक्याने निधन



झाले व आज त्यांच्या दोन्ही मुलांना जॉब मिळाला अत्यंत अनुकूल गरीब परिस्थितीतून शिक्षणाची कास धरत या विद्यार्थ्यांनी अनुकूल परिस्थितीवर मात केली त्यांचे गावभर कौतुक करण्यात आले तर राजीक व तौफिक हे दोन चुलत भावांची ही नियुक्ती झाली आहे म्हणजेच एका कुटुंबातील चार व्यक्ती हुशार होतकरू विद्यार्थ्यांना उदरनिर्वाह पायी मोलमजुरी भुसार सारखे व्यवसाय मधल्या काळात करावे लागले तरी खचून न जाता त्यांनी प्रयत्न सुरूच ठेवले व त्यांच्या प्रयत्नांना यश मिळाले

# बचतगटांच्या नवतेजस्विनी महोत्सवाचे उद्घाटन

**जनसंचलन/बुलडाणा**



नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्प व मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियान महिला आर्थिक विकास महामंडळ जिल्हा कार्यालयातर्फे महिला बचतगटद्वारे उत्पादित वस्तूचे भव्य प्रदर्शन व विक्री अर्थात नव तेजस्विनी महोत्सव २०२४ या महोत्सवाचे उद्घाटन शनिवारी, दि. २४ फेब्रुवारी रोजी गांधी भवनात पार पडला. नव तेजस्विनी महोत्सव दि. २४ ते २७ फेब्रुवारी दरम्यान बुलडाणा येथे पार पडला. आमदार संजय गायकवाड यांच्या हस्ते उद्घाटन पार पडले. महिला आर्थिक विकास महामंडळाचे सहजिल्हा समन्वय अधिकारी समीर देशमुख, शकुंतला रत्नपारखे, वर्षा गवई, रेखा शिंदे, राहुल तायडे यावेळी उपस्थित होते. आमदार गायकवाड यांनी तालुक्यातील बचतगटासाठी बचतभवन आणि १०० बचतगटांना उत्पादित वस्तूंच्या विक्रीसाठी गाळे, तसेच महिला बचतगट संस्था लोक संचलित साधन केंद्र कार्यालय बांधून देण्याचे आश्वासन दिले. महिलांना मार्गदर्शन करताना छोट्या उद्योगासह शाश्वत उपजिविकेसाठी पावले उचलावीत, महिलांची कंपनी स्थापन करून महिलांना शाश्वत रोजगार मिळावे याबद्दल बचत गटातील महिलांना मार्गदर्शन केले. समीर देशमुख यांनी प्रास्ताविक केले. वर्षा गवई यांनी सूत्रसंचालन केले. प्रदर्शनीमध्ये महिलांनी विविध प्रकारच्या उत्पादित वस्तूंचे स्टॉल उभारले होते.

# शिवसाई ज्ञानपीठ व युनिव्हर्सल स्कूल येथे मराठी भाषा गौरव दिन मोठ्या उत्साहात साजरा...

**जनसंचलन/बुलढाणा**

आपल्या महाराष्ट्राला समृद्ध सांस्कृतिक वारसा लाभला आहे :- डी. एस. लहाने विधानसभा अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी बुलढाणा कुसुमाग्रज म्हणून ओळखले जाणारे प्रसिद्ध मराठी कवी आणि लेखक विष्णू वामन शिरवाडकर यांच्या जयंती निमित्त दरवर्षी २७ फेब्रुवारी मराठी भाषा गौरव दिन म्हणून मोठ्या उत्साहात संपूर्ण महाराष्ट्रामध्ये साजरा करण्यात येतो. कुसुमाग्रज हे मराठी साहित्यातील एक प्रमुख व्यक्तिमत्व होते. शिवसाई ज्ञानपीठ व युनिव्हर्सल स्कूलच्या वर्ग नर्सरी, जुनिअर, सिनीअर केजी, च्या विद्यार्थ्यांनी मराठी गीतावर आधारित नृत्य एकांकी नृत्य स्पर्धामध्ये जवळपास एकशे पंच्याहत्तर विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला आणि उपस्थित परीक्षक व प्रेषक पालक याच्याकडून सहभागी विद्यार्थ्यांनी वाहवा मिळविली. कार्यक्रादरम्यान चिमुकले विद्यार्थी मोठ्या दिमाखात महाराष्ट्रीयन पोशाखात त्यांच्या कलेने नृत्य सादर करीत होते. तसेच शिवसाई ज्ञानपीठचे वर्ग १ ते ८ वी चे विद्यार्थ्यांनी ग्रंथ दिंडी चे आयोजन करण्यात आले होते. ग्रंथ दिंडीचे शिवसाई ज्ञानपीठ ते एकता नगर चिंचोले चौक परिसर दरम्यान आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये जवळपास चारशे विद्यार्थ्यनाचा उत्स्फूर्त सहभाग होता. व विद्यार्थिनींनी ढोल ताशाच्या गजरात लेझीमचे



सादरीकरण केले दरम्यान विविध देखावे करत काही लेझिमचे सादरीकरण केलें. तसेच युनिव्हर्सल स्कुल च्या विद्यार्थ्यांनी विविध महाराष्ट्रीयन वेशभूषा परिधान केले होते व सर्व विद्यार्थी व शिक्षक दिवसभर अस्खलित मराठी भाषा बोलण्याची स्पर्धा आयोजित करण्यात आली होती तसेच वर्ग १ली ते १२ वी च्या विध्यार्थ्यानी कुसुमाग्रजांच्या जीवनपटावर आधारित भाषणांचे सादरीकरण, वकृत्व स्पर्धा, सांकृतिक कार्यक्रम, कवीता वाचन, चर्चासत्रे इ. केले व नृत्य सादर करून उपस्थितांचे वाहवा मिळविली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डी. एस. लहाने विधानसभा क्षेत्रीय अध्यक्ष राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी बुलडाणा उपस्थित होते. आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये बोलतांना मराठी भाषा दिन साजरा करणे हि मराठी भाषेचा समृद्ध इतिहास आणि सांकृतिक महत्व साजरे करण्याची संधी आहे. असे सांगुन उपस्थित विद्यार्थी व शिक्षक पालकांना मराठी भाषा गौरव दिनाच्या शुभेच्छा दिल्या कार्यक्रम प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून सविता वानखेडे, चित्रा गर्गे, पाटिल ताई यांनी भूषविले प्रमुख अतिथी च्या हस्ते विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षीस देण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिवसाई ज्ञानपीठ व युनिव्हर्सल स्कूलच्या वर्ग ३ री व ५ वी च्या विद्यार्थिनी मोनाली काळे, वेदिका रिंढे, दुर्वा भंगाळे, श्रावणी पैठणे तर आभार प्रदर्शन वर्ग ३ री चा विद्यार्थी पार्थ मोहरकर ने केले कार्यक्रमाचे आयोजन पल्लवी सिनकर, शीतल गायकवाड व अपेक्षा मुळे तसेच शिवसाई ज्ञानपीठ व युनिव्हर्सल स्कूलच्या सर्वच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य करून कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडला.

# भिवंडी येथील संकेत भोसलेंच्या मारेकरी यांचेवर कठोर कारवाई करा - वैभव वानखडे

**जनसंचलन/ नांदुरा**

भिवंडी येथील दलित तरुण संकेत भोसले यांच्या मारेकऱ्यांवर कठोर कारवाई करा या मागणीसाठी नांदुरा तहसीलदार यांना युवा भिमसेनेच्या वतीने दिनांक २६/२/२०२४ रोजी निवेदन देण्यात आले सदर निवेदनात म्हटले आहे की, दिनांक २२/२/२०२४ रोजी पंधरा ते विस गुंडांनी भिवंडी येथील दलित तरुण संकेत भोसले या अल्पवयीन तरुणावर प्राणघातक हल्ला केला होता त्याला जखमी अवस्थेत दवाखान्यात भरती करण्यात आले परंतु बेदम मार असल्यामुळे तो उपचार सुरू असताना दुसऱ्या दिवशी मृत्यू पावला त्याच्या मारेकरी यांचेवर कठोर कारवाई करण्यात यावी तसेच सदर प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालविण्यात यावे तसेच त्याच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्यात यावी अशी मागणी केली आहे निवेदनावर भाई वैभव वानखडे संस्थापक




अध्यक्ष युवा भिम सेना, अशांत रणित जिल्हा अध्यक्ष, संघराज वाघ, कुलदीप इंगळे, जितू इंगळे, निशांत इंगळे, सुरज इंगळे, युवराज रणित, विकास वाकोडे, नरेश मोजपुरे, आदींच्या सह्या आहेत

# अखेर वझर आघाव ग्रामपंचायत ला मिळाली महिला सरपंच...

**जनसंचलन/ लोणार**

तालुक्यातील वझर आघाव गावचे सरपंच पद अनुसूचित जमाती साठी राखीव साठी आरक्षित होते. डिसेंबर २०२२ मध्ये ग्रामपंचायत निवडणूक झाली. मात्र अनुसूचित जमातीतील पात्र उमेदवार नसल्याने सरपंच पद रिक्त राहिले. मात्र उपसरपंच पदाची निवडणूक झाली. उपसरपंच म्हणून मधुकर सदाशिव आघाव यांची निवड झाली. मध्यंतरी दोन वेळा सरपंच पदाची निवडणूक लागली. परत तेच अनुसूचित जमाती चे आरक्षण असल्यामुळे लायक उमेदवार रिंगणात न राहिल्यामुळे सरपंच पद रिक्त राहिले. सरपंच पद रिक्त राहिल्यामुळे गावचा विकास होण्यासाठी अडचण निर्माण झाली. गावकरी मंडळी वेळो वेळी आरक्षण बदलासाठी आग्रही होते. नुकतेच सरपंच पदाचे आरक्षण अनुसूचित जाती साठी निघाले. आज सरपंच पदावर सौ. साधना संतोष साळवे यांची एकमेव अर्ज आल्यामुळे अविरोध निवड करण्यात आली या वेळी उपसरपंच मधुकर आघाव सचिव कंठाळे सदस्य संतोष रमेश आघाव रामदास आघाव वसंता मोरे सौ शशिकलाबाई आघाव सौ रुख्मिना आघाव सौ अलका सरकटे सौ अल्का सरकटे सौ साधना साळवे सौ द्वारका आघाव सह गावातील संतोष आघाव रामेश्वर आघाव गजानन सरकटे बळीराम आघाव दिलीप आघाव प्रल्हाद आघाव संजय सरकटे गणेश आघाव प्रकाश मोरे गजानन आघाव दिलीप सरकटे गजानन नारायण आघाव ब्रम्हांनंद मस्के आनंद साळवे सर्जेराव साळवे विठल साळवे सुभाष साळवे ब्रम्हा मोरे प्रभू साळवे रामा गंडाळ बंडू आघाव मनोज आघाव शिवणारायन सरकटे गणेश घुगे गणेश शिवकुमार आघाव आदी उपस्थित होते



# जिल्ह्यात अभिनंदनाचा वर्षाव शिवसेना नेते खासदार प्रतापराव जाधव यांचे प्रयत्न लागले सार्थकी..!

## बुलडाणा अर्बन यांनी खामगाव ते जालना रेल्वे मार्गासाठी उचला मोलाचा वाटा बुलडाणा अर्बन १०० कोटी रुपयांचे रोखे त्वरित विकत घेईल - राधेश्याम चांडक





जनसंचलन/बुलढाणा

शिवसेना नेते खासदार प्रतापराव जाधव साहेब यांच्या १५ वर्षाच्या अथक प्रयत्नांना अखेर यश खामगाव-जालना रेल्वे मार्गासाठी केंद्र सरकार बरोबर राज्य सरकारचा ५०% हिस्सा अर्थसंकल्पीय अधिवेशन मध्ये मंजूर. खामगाव ते जालना रेल्वे मार्ग सुरू असलेल्या अर्थ संकल्प २०२४ मध्ये राज्य सरकार ५० टक्के वाटा उचलण्याची मंजुरात दिली असून आशिया खंडात नेहमी अग्रेसर असलेली बुलडाणा अर्बन यांनी खामगाव ते जालना रेल्वे मार्गासाठी मोलाचा वाटा उचलण्याचा अगोदरच जाहीर केले आहे या प्रकल्पासाठी बुलडाणा अर्बन १०० कोटी रुपयांचे रोखे त्वरित विकत घेईल व खामगाव ते जालना सहकार क्षेत्रातील इतर पतसंस्थांकडून २०० कोटी रुपयांची रोके असे मिळून ३०० कोटी रुपयांचे रोखे घेण्यास पुढाकार दिला असून खामगाव ते जालना रेल्वे मार्ग मुळे बुलढाण्यात उद्योग वाढण्याची ही सुवर्णसंधी आहे

# अण्णाभाऊ साठे महामंडळामार्फत नाविन्यपूर्ण योजना

जनसंचलन/बुलढाणा

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळातर्फे मातंग व तत्सम पोटजातीतील नागरिकांसाठी नाविन्यपूर्ण योजना राबविण्यात येत आहे. या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित बुलडाणा मार्फत मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीतील कुटुंबांची सामाजिक, आर्थिक उन्नती व्हावी, त्यांना रोजगार व स्वयंरोजगाराची साधने उपलब्ध व्हावीत, म्हणून समाजातील गरजूंना व्यवसाय प्रशिक्षण देऊन त्यांना उपजिविकेचे साधन उपलब्ध व्हावे, ज्या व्यवसायाचे प्रशिक्षण हवे, त्या व्यवसायाच्या प्रशिक्षणासाठी सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरीता जिल्ह्याकरीता २०० प्रशिक्षण योजनेचे उद्दिष्ट प्राप्त झाले आहे. यासाठी इच्छुक अर्जदारांनी महामंडळाच्या विहीत नमुन्यातील अर्ज जिल्हा व्यवस्थापक, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, चिखली रोड, बुलडाणा जिल्हा कार्यालयास सादर करावे, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक जे. एम. गाभणे यांनी केले आहे. अर्जासोबत अर्जदाराने जातीचा दाखला सक्षम अधिकारी यांच्याकडून घेतलेला असावा, अर्जदाराचा कुटुंबाचा उत्पन्नाचा दाखला उत्पन्न मर्यादा ३ लाखापर्यंत तहसीलदार यांच्याकडुन घेतलेला असावा, नुकताच काढलेल्या पासपोर्ट साईज फोटो, रेशनकार्डच्या झेरॉक्स प्रत, आधार कार्ड झेरॉक्स प्रत, मतदान कार्ड, अर्जदाराचा शैक्षणिक दाखला, प्रशिक्षणार्थी मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीतील असावा, प्रशिक्षणार्थी महाराष्ट्रातील रहिवासी असावा, प्रशिक्षणार्थीचे वय १८ ते ५० वर्षे असावे, प्रशिक्षणार्थीनी यापूर्वी शासन, महामंडळाच्या कोणत्याही प्रशिक्षण योजनेचा लाभ घेतलेला नसावा, एका कुटुंबातील एकाच व्यक्तीस सदर योजनेचा लाभ घेता येईल, प्रशिक्षणार्थीना आधारकार्ड जोडलेल्या बँक खात्याचा तपशील सादर करावा लागणार आहे.

# अर्थसंकल्पाची माहिती देण्यासाठी आलेल्या सरकारला पत्रकारांनी धरले धारेवर...

वृत्तसंस्था/मुंबई

महाराष्ट्र विधानमंडळात आज जाहीर करण्यात आलेल्या अंतरीम अर्थसंकल्पाची माहिती देण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री शंभुराज देसाई, संजय बनसोडे हे अर्थमंत्री अजित पवार यांनी सभागृहात अर्थसंकल्प मांडल्यानंतर विधानभवनातील पत्रकार कक्षात आले. राज्यातील सर्वच घटकांना न्याय देणारा अंतरिम अर्थसंकल्प असल्याची स्तुतीसुमने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांच्या वर उधळीत असतांनाच मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष प्रमोद डोईफोडे आणि कार्यवाह प्रवीण पुरो तातडीने मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या दिशेने गेले. सर्व घटकांना न्याय मिळाल्याचे आपण सांगताहात परंतु पत्रकारांना न्याय मिळालेला नाही, अशा शब्दांत जोरदार तक्रार केली. त्याबरोबर सर्वच पत्रकारांनी असंतोष व्यक्त करीत मे २०२३ मध्ये देण्यात आलेली आश्वासने अद्यापही पूर्ण झालेली नाहीत. शासन निर्णय निघालेला नाही. शंभुराज देसाई यांनी विधानपरिषदेत दोन दिवसांत जी आर निघेल असे सांगितले पण दोन अधिवेशने होऊनही जी आर निघालेला नाही, असे पत्रकारांनी निदर्शनास आणून दिले. किरण नाईक, माई संघटनेच्या संस्थापक अध्यक्ष शीतल करदेकर आदी पत्रकारांनी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या कडे पत्रकारांना तत्काळ न्याय देण्यासाठी जोरदार आग्रह धरला अखेर मुख्यमंत्रांनी पत्रकारांच्या सर्व मागण्या मान्य केल्या असल्याची घोषणा केली.

## एप्रिलमध्ये होता विवाह, त्याआधीच अपघातात मृत्यू

जनसंचलन/ खामगाव

दुचाकी घसरून झालेल्या अपघातात एका लग्न ठरलेल्या युवकाचा जागीच मृत्यू झाला. ही घटना सोमवारी दुपारी खामगाव पिंपळगाव राजा रस्त्यावरील राहुड फाट्यावर घडली. शुभम गणेश तिजारे (२६) असे मृतक युवकाचे नाव आहे. भालेगाव बाजार येथील शुभम तिजारे हा युवक सोमवारी सकाळी शेगाव येथे लग्नासाठी गेला होता. नातेवाईकांचे लग्न आटोपून घरी परतत असताना राहुड फाट्यावर त्याच्या दुचाकीला अपघात झाला, यात दुचाकीवरून फेकल्या गेल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. प्रत्यक्षदर्शींनी त्याला खामगाव येथील सामान्य रुग्णालयात आणले. तपासणी अंती डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या घटनेमुळे भालेगाव बाजार येथे शोककळा पसरली असून, अपघातात ठार झालेल्या शुभमचा २६ एप्रिल रोजी विवाह ठरला होता. मात्र, तत्पूर्वीच कालाने त्याच्यावर घाला घातला

# कास्ट्राईब राज्य परिवहन कर्मचारी संघटनेच्या राज्यध्यक्षपदी धर्मपाल ताकसांडे तर सरचिटणीसपदी सुनिल निरभवणे यांची बिनविरोध निवड...

जनसंचलन/बुलढाणा

कास्ट्राईब राज्यपरिवहन कर्मचारी संघटनेच्या अध्यक्षपदी धर्मपाल ताकसांडे, सरचिटनिसपदी सुनिल निरभवणे व कोषाध्यक्षपदी सदाशिव कांबळे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. २५ फेब्रुवारी २०२४ रोजी नागपूर येथे गणेश पेठ बसस्थानकावरिल अध्यापक भवनात कास्ट्राईब राज्यपरिवहन कर्मचारी संघटनेची सर्वसाधारण सभा आयोजीत करण्यात आली होती. त्यात धर्मपाल ताकसांडे यांची अध्यक्षपदी, सुनिल निरभवणे यांची सरचिटनिसपदी व सदाशिव कांबळे यांची कोषाध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

या बैठकीला राज्यातील विविध विभागातील अध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष, प्रादेशिक सचिव,अध्यक्ष आणि केंद्रीय कार्यकारणी सदस्य ह्या निवडनुकीसाठी मतदार म्हणून मोठ्या संख्येने उपस्थीत होते. अमरावती प्रादेशिक सचिव राजेंद्र माहूरे, नागपूर प्रादेशिक सचिव ॲड.उदय मालाधारी, केंद्रीय सदस्य चंदु जनबंधू यांनी निवडनूक प्रक्रिया पार पाडली.

अध्यक्षपदी निवडझाल्याचे जाहिर करण्यात आल्यानंतर संपूर्ण जिल्ह्यातून आलेल्या पदाधिकाऱ्यानी बिनविरोध निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांचे स्वागत केले. बुलडाणा विभागातून माजी राज्यउपाध्यक्ष बाबासाहेब जाधव, विभागीय सचिव भारत आराख,रवि अवसरमोल,जितू साळवे, जिवन जाधव, दिपक मिसाळकर, आत्माराम चौतमोल, पद्माकर डोंगरे, प्रताप वानखेडे, अनिता वाकोडे इत्यादी पदाधिकाऱ्यांनी ताकसांडे, निरभवणे, कांबळे यांचे बिनरोधध निवडी बद्दल अभिनंदन केले व बाबासाहेब जाधव यांनी निवड झालेल्या कार्यकारणीस भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. अध्यक्ष धर्मपाल ताकसांडे यांनी सर्व उपस्थीत पदाधिकारी कार्यकर्ते यांचे आभार मानले तसेच संघटनेच्या वतीने यापूढे कामगारांच्या प्रलंबित प्रशनांच्या सोडवणूकीसाठी, मागासवर्गियांचा शिल्लक असलेला अनुशेष भरून काढण्यासाठी, शिस्त व आवेदन कार्यपध्दतीत सुधारणा घडवून आणण्यासाठी संघटनेच्या वतीने सतत पाठपुरावा करण्यात येईल असे सांगीतले व केंद्र सरकारने हिट ॲंड रन कायदा रद्द करण्याचा निर्णय घेतला तो निर्णय रद्द करण्यासाठी जो संघटनेने सर्व जिल्हाधिकारी कार्यालयावर जी निदर्शने व धरणे धरली त्या संघर्षाचा विजय आहे व तो कायदा रद्द झाला त्याबद्दल आभार व्यक्त केले.



दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958